नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,
डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग
ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

नांदेड कृषि हवामान सल्ला मंगळवार दिनांक – ०१.१०.२०१९

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ०२ ते ०६ ऑक्टोबर, २०१९)				
दिनांक	२/१०	३/१०	४/१०	५/१०	६/१०
पाऊस (मिमी)	१०.०	०६.०	०३.०	१४.०	०३.०
कमाल तापमान (अं.से.)	३२.०	३१.०	३२.०	३२.०	३३.०
किमान तापमान (अं.से.)	२१.०	२२.०	२१.०	२२.०	२३.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	अंशत: ढगाळ	स्वच्छ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	९१	९४	८९	८८	८५
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६५	५९	५७	५९	५७
वा-याचा वेग (किमी / तास)	०८	०६	०५	०४	०३
वा-याची दिशा	पश्चिम	वायव्य	वायव्य	वायव्य	नैऋत्य

हवामानाचा इशारा		पुढील पाच दिवसात परभणी जिल्हयात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	पाते लागणे, फुले लागणे ते बोंड वाढीची अवस्था	कापूस पिकावरील पांढरी माशीच्या व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ एससी २० मिली किंवा फलोनीकॅमीड ५० डब्ल्युजी २ ग्रॅम किंवा पायरीप्रोक्झीफेन ०५ टक्के ईसी + फेनप्रोपॅथ्रीन १५ टक्के ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.
तुर	फांदया वाढीची अवस्था	तुर पिकात पाने गुंडाळणा-या अळीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास प्रादुर्भावग्रस्त शेंडे गोळा करून नष्ट करावेत व ५ टक्के निंबोळी अर्काची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.
मका	वाढीची अवस्था	मका पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी थायामिथोक्झाम १२ टक्के + लॅमडा सायहॉलोथ्रीन ९.५ झेडसी ५ मिली किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास वरील किटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.

रब्बी ज्वारी	जमिनीची निवड व हवामान	रब्बी ज्वारी पेरणीसाठी मध्यम ते भारी जमीन, पाण्याचा योग्य निचरा होणारी व पाणी साठवून ठेवणारी जमीन निवडावी. मुग / उडीद पीक काढल्यानंतर वखराच्या साहयाने उतारास आडवी मशागत करावी. खरीपातील मुग किंवा उडीद पिकानंतर बळीराम नांगराने सरी काढल्यामुळे या महिन्यात पडणा-या पावसाचे पाणी पुर्णता: त्या सरीमध्ये मुरेल व त्यामुळे उत्पादनात २० ते २५ टक्के वाढ होईल.
सुर्यफूल	जमिनीची निवड व हवामान	सुर्यफूल पेरणीसाठी पाण्याचा उत्तम निचारा होणा-या मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी. पाणी साचून राहणा-या जमिनीत लागवड केल्यास पिकाची योग्य वाढ होत नाही.
रब्बी भुईमूग	जमिनीची निवड व हवामान	रब्बी भुईमूग पेरणीसाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी, हलकी ते मध्यम, भुसभूशीत जमीन निवडावी. जमिनीचा आम्ल – विम्ल निर्देशांक ६.५ ते ७.५ एवढा असावा. भारी काळया जमिनीची निवड करू नये कारण जमिनीत आ-या घुसण्यासाठी व पिकाची काढणी करण्यासाठी त्रासदायक होते. या पिकास साधारणत: २२ ते २८ अंश से. तापमान लागते.
केळी	वाढीची अवस्था	पाऊस झालेल्या ठिकाणी केळी बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेत ५० ग्रॅम पालाश प्रती झाड खत मात्रा दयावी. सिगाटोका रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनॅझोल १० मिली + स्टिकर १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
द्राक्ष	छाटणी पूर्व अवस्था	पाऊस झालेल्या ठिकाणी बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. द्राक्ष बागेत ऑक्टोबर छाटणीसाठी खत मात्रा देण्यात यावी.
सिताफळ	फळ वाढीची अवस्था	पाऊस झालेल्या ठिकाणी सिताफळ बागेत साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा. सिताफळाच्या बागेत पिठया ठेकून या किडीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० मिली + १० ग्रॅम वॉशिंग पावडर १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
भाजीपाला	वाढीची अवस्था	मिरची पिकावरील फुलकिडयांच्या व्यवस्थापनासाठी फेनप्रोपॅथ्रीन ३० टक्के ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. काकडी पीकामध्ये केवडा व भुरी या रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्वस्थापनासाठी ॲझोऑक्सीस्ट्रोबीन २३ एससी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी भाजीपाला पिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा.
फुलशेती	काढणी / वाढीची अवस्था	पुढील काळात नवरात्रोत्सव व दसरा सणामुळे बाजारपेठेत फुलांना अधिक मागणी असते, बाजारपेठ व फुलांची मागणी लक्षात घेऊन फुलांची काढणी टप्याटप्याने करावी. फुलपिकात साचलेल्या अतिरीक्त पाण्याचा निचरा करण्यात यावा.
तुती रेशीम उदयोग	--	फांदया पध्दतीमध्ये रेशीम किटकांना रॅकवर फांदया खादय देताना जास्त दाटी न करता एका थरात खादय दयावे. दोन तासांच्या अंतराने फांदयाची आलटा पालट करून अळया खाली दबलेल्या फांदया खाल्या जातील याची दक्षता घ्यावी. अळयांची विष्टा तेथेच साठून जात असल्यामुळे तेथे कार्बनडायऑक्साईड, कार्बनमोनॉक्साईड सारखे विषारी वायु निर्मीती होते. त्यामुळे रेशीम किटकांची चौथी कात टाकल्यानंतर दुस-या दिवसापासून ६ दिवसात १२ ते १५ किलो विरी गेलेल्या चुण्याची धुरळणी सकाळच्या वेळी खादय देण्यापूर्वी करावी. म्हणजे अच्छादन कोरडे राहील व रोगाची लागण होणार नाही.

पशुधन व्यवस्थापन	--	रक्तपिपासू किटकवर्गीय माशांचा प्रादुर्भाव व त्यांच्याव्दारे प्रसारीत होणारा सरा (ट्रिपॅनी झोमोसीस) या रोगाची पशुधनास लागण होण्याची शक्यता आहे. तरी जे पशू स्वत: भोवती चक्राकार फिरणे, डोळे लाल होऊन स्त्राव गळणे व एकदम दुग्धोत्पादनातील घट व शरीराची ताप वाढणे इत्यादी लक्षणे एकत्र दाखवत असतील अशा पशुस साराप्रतिबंधक औषधीची मात्रा पशुवैदयक तज्ञांकडून देण्यात यावी.
सदर कृषि सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आला.		